नि. क्र. सि-७५ वरील केलेल्या आदेशानुसार पुढील उलटतपासणी व्हिडीओ कॉन्फरंसिंगव्दारे नोंदविण्यात येत आहे.

**साक्षीदाराचा उलटतपास सामनेवालेतर्फे विधीज्ञ श्री.निकम यांचेमार्फत सुरु**

५३. मी सन-२००४ पासून सामनेवाले संस्थेकडे सेक्रेटरी या पदावर कार्यरत होतो. सन-२००४ पुर्वि मी औरंगाबाद येथे जिल्हा परिषदेमध्ये मुख्याध्यापक या पदावर कार्यरत होतो. शेवटी मी खुरताबाद खराडी येथून मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त झालो. मी या प्रकरणामध्ये सचीव या पदावरती सामनेवाले यांच्याकडे कार्यरत असल्याबाबत कागदपत्र दाखल केले आहेत. माझ्या नियुक्ती करताचा ठराव २००४ चा असेल.

५४. तक्रारदार कामगार या सामनेवाले यांच्याकडे जवळपास २००० पासून नोकरीस आहेत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की परंतु त्या काम करीत नाहीत. साधारण २००० च्या सुमारास शाळेचे बांधकाम झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्लॉट नं.६०, एफ सेक्टर एन-४ सिडको औरंगाबाद या ठिकाणी असलेली इमारत ही सामनेवाले शाळेची इमारत आहे. ज्यावेळेस या ईमारतीचे कामकाज चालू झाले त्यावेळेस एस एम कुलकर्णी हे सचीव म्हणून काम करीत होते व अध्यक्ष म्हणून पद्मश्री डॉ. प्रभाकर मांडे हे होते. शाळेचे बांधकाम कधी पुर्ण केले त्याबाबत मी कागदपत्र दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदार व तिचे पती बांधकाम चालू असतांना वॉचमन म्हणून सामनेवाले यांच्याकडे कार्यरत होते. साक्षीदार स्वत: सांगतो की तक्रारदार ही वॉचमन म्हणून कार्यरत होती. सामनेवाले ही संस्था २००० पासून सुरु झाली. प्रथमत: सामनेवाले संस्थेने बालवाडी सुरु केली. २००७ साली सामनेवाले यांना वर्ग-१ ते ७ ची परवानगी मिळाली व वर्ग-८ ते १० ची परवानगी सन-२००५, २००६ व २००७ अनुक्रमे मिळाली. सन-२००० साली दोन शिक्षीका बालवाडीमध्ये नियुक्त होत्या. वर्ग-१ ते ४ साठी चार शिक्षीका नियुक्त होत्या. वर्ग क्र.१ ते ७ पर्यंत सात टिचींग स्टाफ

होता व एक नॉन टीचींग स्टाफ होता. वर्ग क्र. ८ ते १० साठी टीचींग स्टाफ एक, दोन , तीन अनुक्रमे असा स्टाफ होता. आठवी ते दहावी या वर्गासाठी एक शिपाई होता व त्याचे नाव प्रकाश रत्नाकर जोशी. श्री प्रकाश जोशी हे शिपाई म्हणून शाळेची घंटी वाजवणे, साफसफाई करणे इत्यादी कामे करतात. सन–२०११ किंवा २०१२ साली त्यांचे नोकरीबाबत अॅप्रुवल आले. रेश्माबाई कांबळे या शिपाई म्हणून २००१ पासून कार्यरत आहे. सन २०११ – २०१२ मध्ये श्रीमती रेश्मा कांबळे यांच्या नोकरीबाबत अॅप्रुवल आले.

५५. हे म्हणणे खरे आहे की शाळेचा अर्थिक ऑडीट रीपोर्ट दरवर्षी दयावा लागाते व तो आम्ही धर्मदाय आयुक्त व संबंधीत विभागाला देत असतो. जेव्हापासून संस्था स्थापन झाली तेव्हापासून आम्ही धर्मदाय आयुक्त व संबंधीत विभागाला देत होतो परंतु हे सांगता येणार नाही की धर्मदाय आयुक्त यांनी कधीपासून परवानगी दिली. सदरचे ऑडीट रिपोर्ट मी दाखल करु शकतो. सन २००१ पासून रेश्माबाई कांबळे यांना प्राथमिक शाळेत नियुक्ती मिळाली व सन २०११ – २०१२ संबंधीत विभागाकडून त्यांना अॅप्रुवल मिळाले. मी या न्यायालयात शासनाकडून जे गॅड मिळाले ते पुर्विच दाखल केले आहेत. रेश्मा कांबळे व तक्रारदार या एकत्ररित्या कामास लागलेल्या नाहीत सुरुवातीस रेश्मा कांबळे ही कामास लागली व त्या नंतर तक्रारदार ही कामास लागली. संस्थेकडे रेश्माबाई कांबळे या केव्हापासून कामास लागल्या याचा रेकॉर्ड उपलब्ध आहे. सदर साक्षीदार रेश्मा कांबळे या नोकरीस लागल्याबाबतचे कागदपत्रे दाखल करु शकतात. हे पहावे लागेल की रेश्माबाई कांबळे व सावित्रीबाई वाघमारे यांचे ३१ जुलै २००३ रोजी या दोघींची सेविका म्हणून अॅटेंडन्स रजिस्टरला नोंद आहे किंवा नाही. हे म्हणणे चुकीचे आहे की सावित्रीबाई वाघमारे यांची बाकी सर्व रजिस्टरला सेविका म्हणून केलेली आहे.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की रेश्मा कांबळे व सावित्रीबाई वाघमारे यांची ॲटेंडन्स रजिस्टरला सेविका म्हणून नोंद केली आहे ?

उत्तर–तसे म्हणता येणार नाही. सावित्रीबाई वाघमारे यांची नोंद नसावी.

५६. हे म्हणणे खरे नाही की नि.क्र.सि–१३ सोबत दाखल केलेले हजेरी पत्रक हे कोणत्या वर्गासाठी आहे त्याचा उल्लेख नाही.

विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेकरीता तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत माझे समक्ष

**दि. १७/११/२०२५** सही/–
**स्थळ –औरंगाबाद** **(सं.धो. सुर्यवंशी)**
**सदस्य,**
**औद्योगिक न्यायालय, औरंगाबाद**